बाघ प्रकल्पाच्या डाव्या कालवा कि.मी. ० ते ६० मधील कालवा व वितरण प्रणालीची दुरुस्ती, मातीकाम व बांधकामाच्या पुनर्स्थापना व नुतनीकरण कामाचा प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१८/ (प्र.क्र. ४०५ /२०१८)/ सिं.व्य.(कामे)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: १३/०९/२०१९

वाचा -

१. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. ९४९२/विपाविम/कातां-६(१)/(धा.क्र४४१/२०१८)/सन-२०१८,.२६/०९/२०१८.
२. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र क्र. जा.क्र.रातांसस/ कक्ष-१/बाघ प्रकल्प /(धा.क्र.१८/२०१८)/७८६/२०१८, दि.०१.०८.२०१८
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/३५/२०१५/जसं(कामे), दि.०९/०९/२०१५.
४. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/५६६/१७/सिंव्य(कामे), दि.१९/१२/२०१७.
५. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/५६६/१७/सिंव्य(कामे), दि.१९/१२/२०१७.
६. शासन निर्णय क्र.प्रमा २०१३/(प्र.क्र.७८५)/१३)/सिंव्य (कामे) दि.०१.०८.२०१९

प्रस्तावना :-

बाघ प्रकल्प हा गोदावरी खोरे अंतर्गत वैनगंगा उप खो-यातील गोंदिया जिल्हयाच्या सालेकसा तालुक्यातील बाघ नदीवर सिरपूर साठवण धरण (Storage Dam), पुजारीटोला उन्नेयी बंधारा (Pickup weir) व कालीसरार नाल्यावर कालीसरार धरण (Storage Dam) बांधण्यात आले असुन महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन राज्यांचा आंतरराज्यीय संयुक्त प्रकल्प आहे. बाघ प्रकल्पाचे बांधकाम सन १९७० मध्ये पूर्ण करण्यात आलेले असून धरणाची एकूण उपयूक्त साठवण क्षमता २२९.३५ दलघमी आहे. आंतरराज्य करारानूसार पाण्याचा वाटा महाराष्ट्र, मध्यप्रदेश ३:१ असा आहे. पुजारीटोला धरणातून सिंचनाकरीता डावा कालवा ६० कि.मी. व उजवा कालवा ६५ कि.मी. लांबीचा (२९ कि.मी. महाराष्ट्र व ३६ कि.मी. मध्यप्रदेशच्या हद्दीत) मुख्य कालवा काढण्यात आला असुन त्याद्वारे सालेकसा, आमगांव व गोंदिया तालुक्यातील १६५ गावातील एकुण ३५७१८ हेक्टर क्षेत्रात सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे. वर्ष १९७० पासूनच कालव्याद्वारे सिंचनास सुरुवात करण्यात आली. बाघ प्रकल्पावरील मुख्य कालवा, शाखा कालवा, वितरिका, लघु व उपलघु कालव्याची एकुण लांबी ४५० कि.मी. असुन त्यावर लहान मोठी २८६६ बांधकामे आहेत.प्रकल्प परिसरात नियमित अतिवृष्टीमुळे मुख्य कालवा व वितरण प्रणाली मधील माती कामे बऱ्याच प्रमाणात विस्कळीत झालेले आहेत..कालव्याच्या तळात गाळ साचलेला आहे. तसेच प्रवाही भागात वाढलेल्या गवतामुळे कालव्याची वहन क्षमता कमी झालेली आहे.कालव्यावरील बांधकामे ४५ वर्षे जुनी असल्याने बहुतांश कामे क्षतीग्रस्त झालेली असून काही बांधकामे पुर्णत: व काही बांधकामे अंशत: क्षतीग्रस्त झालेली आहेत. क्षतीग्रस्त झालेल्या बांधकामातून मोठ्या प्रमाणात गळती होऊन पाणी वाया जाते.वरील कारणामुळे कालव्याच्या पुच्छ भागात पाणी पोहचविण्यात अडचणी निर्माण झालेल्या असल्यामुळे निर्मित सिंचन क्षमतेपेक्षा प्रत्यक्ष सिंचन कमी होत आहे.त्यानुषंगाने कालवा वितरण प्रणालीचे काटछेद संकल्पीत काटछेदाप्रमाणे पुनर्स्थापित

करणे, अंशत: क्षतीग्रस्त बांधकामाची दुरुस्ती करणे व पूर्णत: क्षतीग्रस्त बांधकामाची पुर्नबांधणी करणे अत्यंत गरजेचे आहेत. त्यामुळे पुच्छ भागावरील अंदाजे २४०० हे. क्षेत्रास सुरक्षित व सुरळीत वेळेवर सिंचनाकरीता पाणी उपलब्ध होत असलेले २४०० हे. क्षेत्र सिंचनापासुन वंचीत राहते. नमुद दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यावर वंचीत राहीलेले २४०० हे. क्षेत्राची पुर्नस्थापना होईल.सदर कामाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, पाणी वापरसंस्थेने व लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी केलेली होती. या शासन निर्णयान्वये विभागास देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर कामाकरीता विशेष दुरुस्ती / विस्तार व सुधारणातंर्गत प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

बाघ प्रकल्पाच्या डाव्या कालवा कि.मी. ० ते ६० मधील कालवा व वितरण प्रणालीची दुरुस्ती , मातीकाम व बांधकामाच्या पुनर्स्थापना व नुतनीकरण कामाचा विशेष दुरूस्ती / विस्तार व सुधारणा अंतर्गत रु.**१,१६,३४,०८,९७३** (Including Royalty **१,४३,८०,०००**), ETP रु.**३,४२,८८,६८९, १२ टक्के** GST **रु.१३,७१,५४,७५७** अशा एकूण रु.**१३३,७८,५२,४१९ (रू.एकशे तेहतीस स कोटी अठ्ठयाहत्तर लक्ष बावन हजार चारशे एकोणीस फक्त)** एवढया खर्चाच्या प्रस्तावास आं.वि.स.व उ.स. तथा नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. शासन परिपत्रक क्र.प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिं.व्य.(कामे), ०१.०१.२०१५ मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे अभिलेखे ठेवणे व कार्यवाही करणे महामंडळावर बंधनकारक आहे.

२. शासन पत्र दि.०४/०६/२०१६ अन्वये तपासणी सूचीतील मुद्दे आर्थिक निकष मा. राज्यपाल यांच्या निर्देशानुसारनिधी खर्च करणे, दायित्व निर्मिती मर्यादेत राहण्यासाठी कामाचे दोन वर्षाचे नियोजन करणे याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची राहील.

३. तांत्रिक मान्यतेपूर्वी बांधकामाचे सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनावर आधारित तरतूद करण्याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची राहील.

४. अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे / संकल्पने दरसूची बाह्यबाबी व वहन अंतरे तपासून अंदाजपत्रकास सक्षमस्तरावर तांत्रिक मान्यता प्रदान करावी.

५. कालव्यातील गाळ काढणे, कालवा भराव व गवत झाडे / झुडपे काढण्याची कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध मशिनरीव्दारे करावीत.

६. प्रस्तावीत कामांमुळे होणाऱ्या खोदकाम/ तोडफोड याव्दारे उपलब्ध होणारे बांधकाम साहित्याचा पूर्ण वापर करुन बचत साधावी.

७. कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावा. सदरची कामे पूर्ण होईपर्यत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा पूर्णत्व अहवाल शासनास त्वरीत सादर करावा.

८. विषयांकित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकातील तरतूदी, दर, वहनअंतर, संकल्पन व इतर तांत्रिक निकष याबाबतची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रिय मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांची राहील.

९. सदर प्र.मा. अंदाजपत्रकातील कामांसाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. तसेच प्रस्तावास प्रशासकीय मान्यतेची मंजूरी दिल्या नंतर पुन्हा सुधारीत प्रशासकीय मान्यता देता येणार नाही . या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्तीय अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दत याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१०. बाघ प्रकल्पावरील दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यावर वंचीत राहीलेले २४०० हे. क्षेत्राची पुर्नस्थापना होणार आहे.तरी सदर दुरुस्ती कामामुळे २४०० हे.सिंचन क्षेत्र पुर्नस्थापित करण्याची संपूर्ण जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील

११. सदर दुरुस्ती काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रांतर्गत १४ पाणी वापर संस्था स्थापित करुन लाभक्षेत्र हस्तांतरीत करणेची संपूर्ण जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

१२. लायनिंग प्रस्तावित असलेल्या ठिकाणी आवश्यक CNS ची जाडी प्रचलित पध्दतीने संकल्पित करुनच निश्चित करावी.

१३. सदर अंदाजपत्रकात १२% वस्तु व सेवा कर गृहित धरण्यात आला आहे. तथापि, जलसंपदा विभाग सामाईक दरसूची सन २०१७-१८ मधील सर्वसाधारण टिप्पणी मुद्दा क्र. अ) १) नुसार प्रत्यक्ष वस्तु व सेवा कराची परिगणना करावी व त्यानुसार सक्षम स्तरावर तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घ्यावी.

१४. जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.दुरुस्ती २००८/(३२७/२००८)/सिं.व्य (कामे) दि.१०/०९/२००८अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त बाघ प्रकल्प डावा कालवा पुनर्स्थापना व विशेष दुरुस्तीची कामे व जलसंपदा विभागा शासन निर्णय क्र.दुरुस्ती २०१६/(९५/२०१६)/सिं.व्य (कामे) दि.०१/०४/२०१६अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त बाघ प्रकल्प डावा कालव्यावरील कि.मी ३३ ते ६५ मधील उर्वरित मातीकाम व बांधकाम मध्ये अंतर्भूत कामांचा समावेश विषयांकित प्र.मा प्रस्तावात नसल्याची खात्री क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी व्यक्तिशः करावी.यापूर्वी प्राप्त प्रमातील कामे पुनश्च घेतल्यामुळे भविष्यात कोणत्याही प्रकारची आर्थिकअनियमितता झाल्यास बाबतची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रिय मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांची राहील.

१५. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील विशेष दुरुस्ती/विस्तार व सुधारणांतर्गत प्रगतीपथावरील कामांचे प्रलंबित दायित्व हे सद्य:स्थितीत अडीच पटीच्या मर्यादेतील वर्क प्लॅनपेक्षा जास्त झालेले असुन अतिरिक्त निधी उपलब्ध झाल्यानंतरच सदर काम हाती घेण्यात यावे, याची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी संचालकांची राहील.

प्रस्तावित कामावर होणारा खर्च ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (११) विविध पाटबंधारे महामंडळांना भागभांडवली अंशदान (विस्तार व सुधारणा) ११ (०१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (कार्यक्रम)(४७०१ जे १५८) ५४, गुंतवणुका या मुख्य लेखाशिर्षखालीकरावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा, याची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी संचालकांची राहील.

शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/(प्र.क्र.३०/२०१३)/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ व पृ.क्र.६२ मध्ये विहित केलेल्या

खर्चाबाबतीत रू. ५.०० कोटी पर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे विभागास प्राप्त अधिकाराच्या अनुषंगाने आंतरवित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने ,तसेच नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२२/१४३४ दि. ०७/०९/२०१९ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२४४/१९व्यय-१२ दि. ११.०९.२०१९ नुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिंव्य (कामे) कार्यासनाच्या नोंदवही मध्ये अनुक्रमांक २३ वर नोंदवण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्र. २०१९०९१३२०४५४३०५२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: CN = Atul Ashok Kapole, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.09.13 20:39:49 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन,मुंबई,
६) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद , मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
७) मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
८) मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१०) सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर,
१३) कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव,
१४) मुख्य अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर,
१५) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१६) अधीक्षक अभियंता,भंडारा सिंचन मंड्ळ ,भंडारा.
१७) कार्यकारी अभियंता,बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग,गोंदिया.
१८) कार्यकारी अभियंता, गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग, नाशिक,
१९) सिं.व्य.(कामे) कार्यासन संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१८/ (प्र.क्र.४०५/२०१८)/ सि.व्य.(कामे), दि. १३ /०९ /२०१९ चे सहपत्र

परिशिष्ट अ

अ.क्र.	विवरण	किंमत (रु.)
भाग १	बाघ डाव्या कालवा कि.मी. ० ते ६० व वितरण प्रणालीतील बांधकामाची दुरुस्ती व पुर्नस्थापना कामावर होणारा खर्च	
	i. जलसेतू दुरुस्तू	२१,६५,५१,४५३
	ii. विमोचक दुरुस्ती	२५,९७,६४,२२९
	iii. पूल दुरुस्ती	१७,३२,५६,०२७
	iv. इतर बांधकामे दुरुस्ती	
	a) Fall	१,४२,४०,७९७
	b) escape	२,१८,०७,५१६
	c) निवड्क लांबीत सिमेंट अस्तरीकरण	२९,९०,१४,२५९
	एकुण (भाग १)	९८,४६,३४,२८१
भाग २	यांत्रिकी संघटने मार्फत करावयाचे कालव्याचे मातीकाम, गाळ व गवत काढण्याचे कामावर होणारा खर्च	
	i. कालव्यावरील गवत झा्डे-झुड्पे काड्णे व सेवापथ /निरीक्षण पथ दुरुस्ती	१७,२७,०२,०३१
	एकुण (भाग १ व भाग२) (Including Royalty १,४३,८०,०००)	१,१५,७३,३६,३१२
	पाणी वापर संस्था स्थापन करणे	६०,७२,६६१
	एकुण	१,१६,३४,०८,९७३
	३ टक्के अनुषंगिक खर्च	३,४२,८८,६८९
	१२ टक्के GST	१३,७१,५४,७५७
	एकुण खर्च	१३३,७८,५२,४१९

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: CN = Atul Ashok Kapole, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.09.13 20:40:05 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव